Shiv Chhatrapati Shikshan Sanstha
Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur. 413512 (M.S.)
(Autonomous)
(NAAC Reaccredited 'A' grade with CGPA 3.38,
CPE (Phase III) Status by UGC & FIST support by DST )

National Conference
on

# Human Rights and Social Justice

**NCHRSJ-2016**

13th & 14th, March 2016

## PROCEEDINGS

ISBN 978-93-5240-046-1

Chief Editor
Dr. S.D. Salunke
Principal

Editor
Dr. M.H. Gavhane
Vice-Principal

Editorial board
Prof. S. S. Patil
Prof. M. V. Shelke
Prof. D. M. Bansode
Prof. V. D. Waghmare

Organised by
Department of Political Science
Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur. 413512 (M.S.)



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1


३७. मानवी हक्क आणि असंघटीत क्षेत्र ........................ 97-100
प्रा.माधव त्र्यंबकराव शेळके, डॉ. महादेव गव्हाणे

३८. मानवी हक्क आणि महिला सबलीकरण ........................ 101-103
प्रा. विकास दशरथ वाघमारे

३९. दहशतवाद : मुंबई ते पठाणकोट... व्हाया श्रीनगर ........................ 104-107
प्रा. डॉ. राजू भागाजी बनारसे

४०. मानवी हक्क आणि सामाजिक समता ........................ 108-109
प्रा. बिरादार एन. पी.

४१. बालकामगार ........................ 110-111
प्रा.विश्वनाथ महादेव आवड

४२. बालकामगार समस्येची कारणमीमांसा ........................ 112-113
प्रा. रामराव चव्हाण

४३. बालकामगार समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन ........................ 114-115
प्रा.डॉ.दाडगे सुरेखा वैजनाथराव

४४. बालमजूर एक समस्या : कारणे, उपाययोजना ........................ 116-117
प्रा.हर्षवर्धन दामोदर जाधव

४५. मानवी हक्क आणि बाल कामगार ........................ 118-119
खंडेराव हरिभाऊ काळे

४६. भारतीय बालकामगार एक सामाजिक समस्या ........................ 120-122
प्रा. बळीराम पवार

४७. बालकामगार आणि मानवी हक्क ........................ 123-124
प्रा. गजानन बाबुराव मरगीळ

४८. बालमजुरी : सुसंस्कृत समाजावरील एक कलंक ........................ 125-126
प्रा.डॉ. उत्तम छाजु राठोड

४९. मानवी अधिकार आणि कामगारांचे शोषण ........................ 127-128
डॉ. दिपक एस. वाघमारे

५०. बालकामगार समस्या आणि मानवाधिकार ........................ 129-131
प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव

५१. मानवाधिकार एवं संयुक्त राष्ट्रसंघ ........................ 132-133
डॉ.चौधरी हरिश्चंद्र जनार्दन

५२. मानवअधिकार और शिक्षण की आवश्यकता ........................ 134-135
प्रा.डॉ.एम.ए.येल्लूरे

५३. वैश्विक मानवाधिकार व भारतीय संविधानातील मुलभूत अधिकारांचा तुलनात्मक अभ्यास ........................ 136-137
प्रा. ढोले चंद्रशेखर शंकरराव, डॉ. शिंदे सर्जेराव

५४. महिलांच्या मानवी हक्काविरुध्द कौटुंबिक हिंसाचार ........................ 138-142
प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव


Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1

५४.

# महिलांच्या मानवी हक्काविरुध्द कौटुंबिक हिंसाचार

**प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड
मो.नं. ०९४२३४३९२७६

**पिता रक्षति कौमार्ये : भ्रातार रक्षति यौवने, रक्षन्ति पुत्र दारुवरे, न स्त्री स्वतंत्रते तम अर्हती** या विधानावरुन भारतातील स्त्रियांची जन्मकहाणी समजुन येते. स्त्री पुरुषाशिवाय जगाचे अस्तित्व आणि विकास अशक्य आहे. या दोघांशिवाय जग, कुटुंब आणि मानवी जीवन अपूर्ण व रिक्त आहे. दोघांचे अस्तित्व परस्परांचे अनिवार्य तत्व आहे. परंतु या विश्वात स्त्रीच्या अस्तित्वास अनादीकाळापासून नाकारण्यात आले आहे. प्राचीन धर्म ग्रंथ मनुस्मृतीत मनु म्हणतो की, **यत्र नार्यस्तु पुज्यंन्ते, रमते तत्र देवता, यत्रैतास्तू न पुज्यन्ते सर्वास्तत्रा फला : क्रिया.** म्हणजेच जेथे स्त्रीची पूजा केली जाते. तेथेच ईश्वर निवास करतो. पुजा म्हणजे सम्मान, प्रतिष्ठा. ज्या ठिकाणी स्त्रीचा सन्मान होतो त्याचठिकाणी सुख आणि समृध्दी वसते. जेथे स्त्रीचा सन्मान होत नाही तेथे प्रगती, विकासाचे सर्व मार्ग व क्रिया निष्फळ ठरतात. राज्यशास्त्राचा जनक **ॲरिस्टॉटलच्या** मते स्त्रीचा विकास किंवा विनाश यावरच राष्ट्रांची प्रगती किंवा नाश अवलंबून रहातो. साम्यवादी प्रणेता **कार्ल मार्क्सच्या** मते, कोणत्याही समाजाची दशा आणि दिशाविषयीची माहिती किंवा अंदाज त्या समाजातील स्त्रियांच्या स्थितीवरुन घेता येतो. अगले जनम मे इस देश मे न आना लाडो, प्रभुजी मै तोरी विनंती करु पैया पडू बार बारा अगले जनम मोहे बिटीया न दिजे नरक दिजे चाहे डार या गितातुन भारतीय स्त्रियांची स्थिती आणि स्त्रियांच्या वेदना समजुन येतात.

वरील सर्व विधानावरुन असा अंदाज बांधता येतो की, समाजात स्त्रियांचे स्थान महत्वाचे असते. स्त्रियांच्या सशक्तीकरणातुनच कुटुंब, कुटूंबाच्या सशक्तीकरणामुळे समाज आणि समाजाच्या सशक्तीकरणाने राष्ट्र शक्तीशाली बनते. **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या** मते हिंदु समाजातील महिलांच्या प्रगतीवरच त्या समाजाच्या प्रगतीचा अंदाज लावता येतो. भारतीय समाज तर आता प्रगतीच्या दिशेने मार्गस्थ आहे. परंतु वास्तवतेत महिलांची स्थिती पाहता परिस्थिती अत्यंत भयावह व दम घोटणारी आहे. त्यामुळेच महिलाप्रति वाढती हिंसा वैश्विक घटना आहे. ज्यास कोणताही देश, समाज व समुदायातील महिला अपवाद नाहीत. **अनंत फडकेंच्या** मते स्त्रियांचे श्रम, श्रमशक्ती, लैंगिकता व प्रजनन क्षमता यांच्यावर पुरुषांचे वर्चस्व म्हणजे पुरुष सत्ताकता, ते केवळ खाजगी मालकीचे अपत्य नसुन त्यासोबत उगम पावलेली दमणाची, शोषणाची ती एक स्वायत्त व्यवस्था आहे.

**डॉ.जगदेश्वर चतुर्वेदी** स्त्रीवादी साहित्य विमर्श मध्ये लिहितात. स्त्री समतेच्या संघर्षाप्रती दया व सहानुभूतिची गरज नाही. परंतु तो समजुन घेण्याचा विचार आहे. तो स्त्रिचा अधिकार आहे. जो तिला दयावा लागेल. तो देण्यात मानसशास्त्रीय, राजकीय, सामाजिक व आर्थिक समस्या असतील तरीही दयावा लागेल. कारण स्त्री सृजनशील आहे. उत्पादक आहे. श्रमिक आहे. ती उपभोगाची वस्तु नाही. स्त्रिला सृजनशील मानण्याऐवजी उपभोगाची वस्तु मानल्यास तिच्याभोवती सामाजिक बंधने वाढतात. तिचे सर्व सामाजिक अधिकार हिसकावून घेतले जातात. तिला तिच्या स्वतंत्र ओळखीपासुन वंचित केले आहे. स्त्री समानतेसाठी चालवण्यात आलेला संघर्ष पितृसत्ताक विचारधारे सोबत उपभोगवादी भांडवलशाही विचारसरणीच्या सोबत आहे. स्त्री समानतेचा लढा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय या तिन्ही स्तरावर समप्रमाणात चालवावा लागेल. मनुष्य म्हणुन स्त्रीला प्राप्त होणारे अधिकार कोणते ? तिला तिच्या अधिकारापासुन कोण वंचित ठेवते ? जीवन जगणे, सुरक्षा व संरक्षण हे मुख्य अधिकार तिला केंव्हा मिळतील ? यासाठी वर्तमान आणि भविष्यात येणारी पिढी या दोघांना ही स्वतः आत्म परिक्षण करावे लागेल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वप्रथम १९७४ साली महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आयोगाची स्थापना केली. १९७५ साली आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे प्रथम सम्मेलन झाले. ज्यात महिला प्रश्नांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळाली. युनोने १९७५ - १९८४ हे आंतरराष्ट्रीय महिलादशक घोषित केले.

मानवी हक्काबाबत प्रश्न असा निर्माण होतो की, हे सर्व मानवी हक्क मनुष्य म्हणुन जन्माला येणाऱ्या एका व्यक्तिसाठी नैसर्गिक आहेत. परंतु व्यवहारात त्या सर्वांचा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य सर्वांना मिळते का ? भारतीय संविधानातील कलम १२ ते ३५ मध्ये मुलभुत अधिकाराची तरतुद केली आहे. भारतीय स्त्रीस हे सर्व अधिकार मिळतात का ? २६ जानेवरी १९५० रोजी करण्यात आलेली सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची आश्वासनापुर्ती स्त्री बाबत पूर्ण झाली का ? संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारे प्रकाशित दि हयुमन डेवलपमेंट रिपोर्ट दी प्रोग्रेस ऑफ दी वर्ल्डस वुमेन



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1
या अहवालात भारतीय स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा दर्शवण्यात आली. त्यानंतर यु.एन.डी.पी. ची कागदपत्रे व समान यु.एन.फंड. फॉर डेव्हलपमेंट ऑफ वुमेन्सच्या स्कोरकार्डात स्त्री समानतेसाठी केलेल्या कार्याची स्तुती करण्यात आली. ज्या अंतर्गत भारतीय महिलांच्या लिंग समानतेच्या क्षेत्रात कार्य अधिक होण्याची गरज दर्शवली. परंतु व्यावहारिक आकलन हे सिध्द करते की, आणखीन ही स्त्रियांना अधिकार प्राप्त झाले नाही. त्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे.

पारंपारीक दृष्टया आमच्या समाजात स्त्रियांना रचनात्मक कार्यक्षेत्र किंवा कोटुंबीक सत्ता श्रृंखलात पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा देण्यात आलेला नाही. उदा. परशुरामामार्फत वडीलांच्या सांगण्यावरुन निरपराध मातेच्या खुनाचा प्रसंग, गौतमाचे इंद्राद्वारा छळलेल्या आपल्या पत्नीस दगड बनवणे, शकुंतलेचे निर्वासन, सीतेचा परीत्याग, गांधारीचे अंध वैवाहिक जीवन जगणे, कुंतीचे अभिशापीत मातृत्व, द्रोपदीचे वस्त्रहरण, दिल्लीच्या अनुराधाचा भुख व भयाने झालेला अंत, बसमतिया किंवा भंवरीबाई, फुलनदेवी किंवा नैना सहानी, जैसीका लाल असो किंवा राज्यस्थान मध्ये मारण्यात आलेली नर्स भंवरीबाई या सर्वांचा प्रवास हे सिध्द करतो की, प्रत्येक युगातील सर्वात कमजोर व दबलेला वर्ग म्हणजे स्त्री होय. याही पलीकडे जावून पुरुषांच्या अपराधाची सजा नेहमी स्त्रियास दिली जाते. पुरुषामार्फत दिलेल्या अर्वाच्य शिव्या स्त्रियांनाच अपमानीत करतात. मग ती कोणतीही स्त्री असो. ती एखादया खेडयातील अनाडी असलेली महिला असो किंवा इंग्लंडची राजकुमारी प्रिंसेस डायना असो. श्रृंखलेची हि धारा काय सांगते ? का स्त्रियांना त्यांचे मानवाधिकार मिळाले ? याचे उत्तर नाही हेच आहे. या सर्व बाबतीतून हे स्पष्ट होते की स्त्रिया विरुध्द हिंसा, अत्याचार, शोषण आज हि जशास तसे आहे.

स्त्री ही जगाची जन्मदात्री आहे. ती संपुर्ण जगाचे पालन-पोषण करते . तरी तिची सदैव निंदा केली जाते. सदैव शोषण व अत्याचार केले जातात. स्त्रियांनी समाज व राष्ट्राच्या विकासासाठी त्याग, तपस्या, आणि बलिदान दिले. पोलिस प्रशासन हि स्त्रियां वर होणारे अन्याय पाहून दुर्लक्ष करते. बलात्कार , हुंडा पध्दती, हत्या इ. बाबत जे प्रकरण पुढे येतात त्यातील बरेच सबळ पुराव्याअभावी नष्ट होतात. माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटलांनी स्त्रियांच्या साक्षरता प्रमाणाबाबत चिंता व्यक्त करताना संबोधले. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात साक्षरतेचे दर ५.३५% होता. स्वातंत्र्यानंतर तो १८.३३ आणी आज ६४.८४ आहे. परंतु स्त्रि आणी पुरुषांच्या साक्षरतेचे फार अधिक अंतर आहे. ग्रामिण भागात हे अंतर अधिक वाढत आहे.

The advances towards the gender equality have been uneven and there is still a long way to go to make the premises made at Beijing a reality म्हणजे लिंग समानतेच्या क्षेत्रात जी प्रगती झाली. ती समाधानकारक व समान नाही. बिजींग सम्मेंलनात यासाठी जी आश्वासने दिली ती वास्तवतेत आणण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. महिलांना सबल बनवण्यासाठी निर्णय निर्धारणात महिलांचे प्रतिनिधीत्व आवश्यक आहे. आज समाजातील महिलांचे हीन स्थान असमानतेचे मुख्य कारण आहे. महिलांप्रती मानसिक आणि शारिरीक हिंसा जन्मापासून मृत्युपर्यंत बरोबर असते. आज ही सर्व देशातील महिला २१ व्या शतकातील जागतिक समस्या आणि आव्हानांचा सामना करत आहेत. तर दुसऱ्या बाजुने वाढती गरीबी आणि वाढती अनिश्चितता व दिवसेंदिवस वाढणाऱ्या शोषण, अत्याचार व काळजाला पाजर फुटणाऱ्या हिंसात्मक घटनांची बळी जात आहे. २०१३ च्या अहवालानुसार देशभरात ३ लाख महिला छळ गुन्ह्यांची नोंद झाली. त्यापैकी महाराष्ट्रात २४ हजार ८९५ गुन्ह्यांची नोंद झाली. महिलांनी पुन्हा एकदा जगातील मानवी हक्कांचे प्रशंसक, समानता आणि सुरक्षा व शांततेंची प्रार्थना करणाऱ्या राष्ट्राचे नेता, आंतरराष्ट्रीय संस्था आणि समुदायासमोर स्त्री जीवनाचे वास्तव सत्य स्पष्ट करुन त्यांच्या चेहऱ्यावरील मुखवटे हटवले. कारण आज लिंगभेदामुळे स्त्रिला कायदयात्मक, सामाजिक आणि आर्थिक हक्क न मिळने वैश्वीकरणाच्या युगात एक मोठे आव्हान बनले. त्यामूळेच महिलांचे आज अधिक शोषण होत आहेत. अवैधरीत्या होणारा स्त्रि देह व्यापार संपूर्ण जगासमोर एक समस्या बनली आहे. अवैध देह व्यापार, शोषण, वेश्यावृत्ती, बळपुर्वक श्रम करुन घेणे, गुलाम बनवुन देह व्यापाऱ्यास प्रेरीत केले जाते. जागतिकीकरणात महिलांच्या मागण्यात सदैव वाढ होत आहे. जग २१ व्या शतकात प्रवेशीत झाले. नव्या जागतिक व्यवस्थेत स्त्री आणि पुरुषाना समान संधी आहेत. जोपर्यंत जगातील लोकसंख्येचा अर्धा भाग असणाऱ्या महिलानां जाचापासून मुक्त होवून पुरुषां समान जीवन जगण्याची संधी मिळत नाही. तो पर्यंत जगाच्या विकासाचे स्वप्न अपुरे राहील. आपल्या पात्रता व क्षमतेनुसार प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान संधी मिळतील तेंव्हाच विकास होईल.

संयुक्त राष्ट्र संघटनेची संस्था युनिसेफच्या एका अहवालानुसार ४५ देशांच्या महिलांसोबत होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचारास रोखण्यासाठी आवश्यक कायदे बनवले. महिलांसोबत विषमतापुर्ण व्यवहाराच्या समाप्तीची घोषणा ७ नोव्हेंबर १९६७ ला संयुक्त राष्ट्र महासभेद्वारे करण्यात आली. या घोषणेच्या कलम १० नुसार महिलांना मग ती विवाहित असो अथवा नसो पुरुषांसोबत आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समान हक्क प्राप्त करण्यासाठी योग्य व्यवस्था करण्यात यावी. तसेच विशेषत्वे व्यावसायिक प्रशिक्षण दयावे. रोजगार आणि व्यवसाय निवडीबाबत तीव्र भेदभाव करु नये. पुरुषाप्रमाणे वेतन दयावे. पुरुषा समान समान काम व समान वागणुक मिळावी. पगारासोबत संधीचा अधिकार, सेवामुक्ती विशेषाधिकार, बेरोजगारी, रोगी, म्हातारपण किंवा काम करण्यास असमर्थ असलेल्या स्थितीत सुरक्षा मिळावी.

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन आहे. तर १० डिसेंबर हा दिवस संपुर्ण जगात मानवी हक्क दिवस म्हणुन साजरा केला जातो. या दिवशी १९४८ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने मानवी हक्काचा वैश्विक जाहिरनामा घोषित करुन त्यास अंगीकृत केले. या वैश्विक जाहिरनाम्यात प्रस्तावना आणि ३० कलम आहेत. या घोषणापत्राच्या प्रस्तावनेत मानवी समुदायाच्या सर्व सभासदांना गौरवपूर्ण जीवन आणि



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1

समानतेचा अधिकार विश्वव्यापी स्वातंत्र्य, न्याय आणि शांतीच्या अधिकारासाठी आहे.

जेथे पुरुष आणि महिला चांगल्या सामाजिक विकासासोबत अधिकाधिक स्वातंत्र्य मिळवतील. कलम १ ते कलम २० पर्यंत व्यक्तिच्या नागरी आणि राजकीय अधिकारांची व्याख्या स्पष्ट केली. कलम २१ ते ३० पर्यंत व्यक्तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अधिकारांना समाविष्ट करण्यात आले.

क्राईम रेकॉर्ड ब्युरो तर्फे प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार बलात्कार, हुंडाबळी, अत्याचार, विनयभंग व हुंडाप्रतिबंधक इ.कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात २००० ते २००४ या वर्षात बलात्काराचे गुन्हे ६५०१०, हुंडाबळी व हुंडाप्रतिबंधक गुन्हे- १२८८२५, अत्याचाराचे गुन्हे - १९६८३१, विनयभंगाचे गुन्हे - १३२२४३ गुन्ह्यांची नोंद झाली. युनिसेफ या आंतरराष्ट्रीय संघटनेने भारतात २०११ मध्ये प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार एका वर्षभरात शारिरीक अत्याचार सहन करणाऱ्या महिलांचे प्रमाण ७.२ टक्के आहे. तर शारिरीक व लैंगिक अत्याचार सहन करणाऱ्या महिलांचे प्रमाण ३७.२ टक्के आहे. देशभरात २० टक्के महिला कुंटुंबाच्या छळाला बळी पडतात. लैंगिक अत्याचारानंतर बदनामाची भिती, असहाय्यतेची भावना, असुरक्षितता, समाजाचा अविश्वास, मानसिक धक्का, भिती व ताण, लैंगिक संबंधातुन पसरणारे आजार, नको असलेले गर्भारपण इत्यादी कारणामुळे स्त्रिया त्याची वाच्यता बाहेर करत नाहीत. २००५ सालच्या राष्ट्रीय पातळीवर आकडेवारीनुसार ८५ टक्के गरीब, ८० टक्के श्रीमंत व ६० टक्के मध्यमवर्गीय कुटुंबात महिलावर अत्याचार होतात. हिंसाचार, परित्याग, व्याभिचार, षंडत्व, इतरांचे प्रभुत्व व हस्तक्षेप, मानसिक आजार, व्यक्तीमत्वाचे दोष, व्यसन, दारु, मादक द्रव्ये, कर्जबाजारीपणा, जोडीदाराशी न जुळवून घेणे इत्यादी विवाहानंतर कौटुंबिक कलहाची कारणे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार ६८.९६ लाख कुटुंबाच्या प्रमुख महिला आहेत. तरी विवाहीत स्त्रीयामधील कुपोषणाचे प्रमाण ३३ टक्के आहे. युनिसेफच्या अहवालानुसार भारतातील जन्म झालेल्या परंतु त्यानंतर काहीही ठावठिकाणा नसलेल्या मुलींची संख्या ५० दशलक्ष आहे. युनायटेन नेशनच्या अहवालानुसार भारतात दरवर्षी होणाऱ्या स्त्री भ्रुण हत्यांची संख्या ७ लाख ५० हजार आहे. युनिसेफच्या २०११ च्या अहवालानुसार भारतात रोज बेकायदेशीरपणे २ हजार स्त्री भ्रुण हत्या होतात. दर १०० मुलांमाघे मागे भारतात ९३ मुली जन्माला येतात. जगातील अन्य देशामध्ये हे प्रमाण १०० मुलामागे १०५ मुली हे आहेत. भारतात कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यात वेश्या व्यवसायात स्त्रियांचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. क्राइम पेट्रोल इंडीया, दस्तक, सावधान इंडीया, CID, लक्ष्य या सारखी मालिकामधून भारतात स्त्रीयांच्या कौटुंबिक हिंसाचाराचे चित्र दाखवले जाते. प्रत्येक वर्तमान पत्र , नियतकालिके, न्युज चॅनल्स या सर्वांवरुन स्त्रियांच्या कोटुंबिक हिंसाचाराच्या बातम्या वाचण्यास मिळतात. भारतीय संसद, युनो, जागतीक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक, विविध प्रादेशिक संघटनांच्या व्यासपीठवरुन स्त्रीयांच्या वाढत्या हिंसाचाराविषयी चिंता व्यक्त केली जाते.

जगात मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा निकृष्ट प्रकार म्हणजे स्त्रियांसोबत होणाऱ्या हिंसेला मानले जाते. आज जगातील सर्व स्त्रिया हिंसेच्या समस्येचा सामना करत आहेत. जर आम्ही वैश्विक दृष्टया विचार केला तर जगातील प्रत्येक तीन महिलामागे एका महिलेसोबत बलात्कार होतो. तीला मारहाण केली जाते. शारिरीक शोषण किंवा वेश्यावृत्तीच्या व्यवसायात जाण्यास प्रेरित केले जाते. तीला पुर्ण आयुष्यभर हिंसेच्या अभिशापास भोगण्यासाठी तत्पर रहावे लागते. आज कौटुंबिक हिंसा एक चिंतेचा विषय बनला आहे. वास्तवतेत महिला विरुध्द होणारी गुन्हेगारी स्वरुपाच्या हिंसेचे कोणतेही एक निश्चित कारण सांगता येणार नाही. कौटुंबिक हिंसाचार महिला किंवा मुलींच्या विरुध्द एक वेश्विक समस्या बनली आहे. तिची शारिरीक, मानसिक, यौन उत्पीडन आणि आर्थिक रुपाने हत्या करुन अपंग बनवते. मानवी हक्काचे हे सर्वाधिक व्यापक उल्लंघन आहे. कौटुंबिक हिंसाचारातुन महिला किंवा मुलींना सुरक्षा, सन्मान, समानता, आत्मउत्कर्ष आणि मुलभूत स्वातंत्र्याच्या अधिकारापासुन वंचित ठेवले जते. कौटुंबिक हिंसाचार हा एक असा अपराध आहे ज्याची योग्य पध्दतीने नोंद किंवा रिपोर्टींग केली जात नाही. जेंव्हा एखादी महिला कौटुंबिक हिंसाचाराबाबत तक्रार नोंदवु इच्छिते, मदत मागते तेंव्हा पोलिस तिच्याप्रती उदासिन व्यवहार करतात. कौटुंबिक हिंसाचार विरुध्द तक्रार न नोंदवण्यास अब्रु, बदनामी, बदला घेण्याचे भय, कायदयाचा अभ्यास नसणे, न्यायालयीन प्रक्रिये प्रति विश्वासाची कमतरता व भिती, कायदयाच्या प्रक्रियेवर होणारा खर्च इ. कारणे कारणीभुत आहेत.

जागतिक व्यापार संघटनेने महिलाविरुध्द होणाऱ्या कौटुंबिक व सामाजिक हिंसेचा क्रम जीवन स्तरनिहाय स्पष्ट केला.

जन्मापुर्वीची हिंसा - स्त्री भ्रुण हत्या, लिंग-निदान झाल्यानंतर गर्भाव्यवस्थे दरम्यानच स्त्रीवर होणारे अत्याचार. बाल्यावस्थेतील हिंसा - मुलगी जन्माला आल्यानंतर होणारी हिंसा. त्यास जन्म देणाऱ्या स्त्रीचा होणारा शारिरीक, मानसिक अत्याचार, बाल विवाह, स्त्रीयांचा खतना, शारिरीक योन आणि मानसीक अत्याचार, दुराचारी व्यवहार, बाल वेश्यावृत्ति, अश्लिल साहित्य तयार करण्यासाठी त्यांचा होणारा वापर. तारुण्य व प्रौढ अवस्थेत - डेटिंग आणि सरंजामदारी स्वरुपाची हिंसा (ॲसिड फेक, डेट कालावधीत होणारा बलात्मकार) गरिबीमुळे मजबुरीचा फायदा घेऊन होणारे शारिरीक शोषण (शाळेची फीस भरण्याच्या बदलण्यात होणारी शारिरीक संबंधाची मागणी) कार्यालयीन ठिकाणी होणारे शोषेण, बलात्कार, शारिरीक अत्याचार, अपंग वेडसर महिलेचे शोषण, गर्भपात इत्यादीत. वृध्दापकाळातील - महिलांना आत्महत्या करण्यासाठी विवश करणे, आर्थिक कारणामुळे होणारी हिंसा. यौन, शारिरीक आणि जाणिवेच्या स्तरावर होणारा मानसिक अत्याचार याचा अर्थ आज जागतिक स्तरावर लहानपणापासुन वृध्दापकाळापर्यंत मुली किंवा महिलासोबत होणाऱ्या हिंसाचार रुपी बिमारीने संपूर्ण जगाला ग्रासले आहे.

स्त्रीयांच्या कौटुंबिक हिंसाचारास रोखुन संरक्षण करण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. ब्रिटिश शासनात पास



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1

झालेला १८५६ चा विधवा विवाहाचा कायदा. १८६० सालच्या भारतीय दंड संहितेनुसार महिला विरुध्दच्या अपराधात कठोर दंडाची व्यवस्था करण्यात आली. १८९० चा सती प्रथा विरोधी कायदा. १८९१ चा बाल विवाह विरोधी कायदा. १९६१ चा हुंडा पध्दती बंदी अधिनियम, काम करणाऱ्या महिलांना समान आर्थिक अधिकार देण्यासाठी समान पारिश्रमिक अधिनियम १९७६ चा सती निषेध अधिनियम, प्रसुती पुर्व लिंग निदान तंत्रज्ञान अधिनियम १९९४, प्रसूती सुविधा देण्याचा प्रसुति प्रसुविधा अधिनियम १९६१, वेश्यावृत्ती निवारण अधिनियम १९५६, ऑगस्ट २००५ चा कौटुंबिक हिंसाचार संरक्षण विधेयक, १९७६ चा विवाह कायदा अधिनियम, १९५४ चा विशेष विवाह अधिनियम, हिंदु विवाह अधिनियम १९५५, ३१ जानेवारी १९९२ साली राष्ट्रीय महीला आयोगाने एक विधेयक बनवले ज्यानुसार मुलींचा सातत्याने पाठलाग करने, स्त्रीयांच्या शालीनतेला ठेस पोहचवणे, आपत्तीजनक वस्तू भेट देणे हा गुन्हा मानला जाईल. त्याबद्दल आयपीसी कलम ५०९ (बी) आणि ३५४ अंतर्गत कायदेशीर कार्यवाही करण्याची तरतूद आहे. भारतीय गुन्हेगारी दंड संहिता कलम ३०२ नुसार स्त्रीयावर होणाऱ्या अपराध्यास आजीवन कारावास , हुंडयामुळे मृत्यू ३०४- बी आजन्म कारावास, आत्महत्येसाठी दबाव टाकणे कलम ३०६ - १० वर्षे शिक्षा, खुन करण्याचा प्रयत्न करने कलम ३०७ आजीवन कारावास, मारहाण, गंभीर जखम करणे कलम ३१९, ३२३ नुसार ३ महिने ते ७ वर्ष शिक्षा, दुसऱ्याच्या जिवन सुरक्षा किंवा जिवनावर धोके होणे कलम ३४४, ३३६, ३३८, ३२५ व ३२३ नुसार ३ महिने ते ७ महिने कठोर कारावास, जाणून बुजून नजर कैदेत ठेवणे, १७ महिन्यापेक्षा अधिक, स्त्रीयांची शालीनता नष्ट करण्याचा इच्छेने हिंसा किंवा जबरदस्ती करने कलम ३५४ - ७ वर्षे शिक्षा, अपहरण व पळवून नेणे किंवा स्त्रीस विवाहासाठी मजबूर करने कलम ३६६ - २ वर्षे शिक्षा, नाबालिक मुलीला ताब्यात ठेवणे, कलम ३६६ ए - १० वर्षे शिक्षा, बलात्कार (शासकीय कर्मचाऱ्यामार्फत किंवा सामुहिक बलात्कार अधिक गंभीर मानला जातो.) कलम ३७६ - १० वर्षे उम्रकैद ई.

कौटुंबिक हिंसाचारात पतिमार्फत होणारे शारिरीक शोषण किंवा बलात्कार अधिकांश देशात अपराध मानला जात नाही. म्हणजे एखादी महिला एकदा लग्नाच्या बंधनात बांधली गेली की पुरुष (पति) तिच्या सोबत मनमानेल तसा संभोग करण्याचा अधिकारी बनतो. या समस्येला सोडवण्यासाठी अनेक देशांनी दांपतीक बलात्कारा विरुध्द कायदा बनवण्याच्या दिशेने कार्य केले. उदा. ऑस्ट्रेलिया, बारबाडोस, कॅनडा, सायप्रस, जर्मनी, आयर्लंड, मेक्सीको, नामिबीया, डेन्मार्क, इक्वेडोर, फिनलॅन्डस, फ्रांन्स, न्युझीलँड, स्वीडन, नॉर्वे, दि फिलिपाईस, पोलँड, रशिया, दक्षिण आफ्रिका, स्पेन, इंग्लंड, ट्रिनीदाद, टोर्वेगो आणि अमेरिका ई.

कौटुंबीक हिंसाचारास रोकण्यासाठी जे कायदे बनवले जात आहेत. त्यात प्रगती होत आहे. परंतु अडचण अशी आहे की, पिडीत महिला आरोपीस गुन्हेगार सिध्द करण्यासाठी आवश्यक पुरावे मिळू शकत नाहीत. स्टीफन ए आइसेनटेंट आणि लुंडी बेक्राष्ट च्या मते कौटुंबिक अत्याचार किंवा अन्याय कौटुंबिक संबंधात पतिमार्फत होणारा मानसिक, आर्थिक आणि बलपूर्वक संभोग अत्याचाराचे असे स्वरुप आहे, ज्यास शारिरीक जखम किंवा शरीरास हानी पोहचवणारे खात्रीलायक धमक्याद्वारे चिन्हीत केले जाते. महिला अत्याचार किंवा कौटुंबिक हिंसा सांस्कृतीक दृष्टया समर्थन प्राप्त होणारे वर्तन किंवा प्रवृती आहे. जी पाशवी स्वरुपाच्या संबंधाना जन्म देते. या अत्याचाराचे लक्ष्य साधारणपणे महिला किंवा मुली असतात. एका महिलेस या जाचातून मुक्त होण्यासाठी वर्षे लागतात. या कालावधी दरम्यान अत्याचाराच्या प्रमाणात सदैव वाढ होते. जागतीक व्यापार संघटनेच्या २००२ च्या अहवालात कौटुंबीक व वैवाहिक हिंसेला व्यापक स्वरुपात परिभाषित केले. स्त्री होण्याची शिक्षा मध्ये अरवींद जैन यांनी लिहिले की समाजसेवी संस्था, संशोधन कर्ते आणि विचारवंताच्या सल्यानुसार १९८६ मध्ये पुन्हा एकदा बिल नंबर ४४ मांडण्यात आले. जे तत्कालीन राष्ट्रपतीच्या मंजुरीने २६ जानेवारी १९८७ पासून लागु झाले. या अधिनियमाचे नाव महिला आणि बालीाक अनेतीक देह - व्यापार नियंत्रण अधिनियम असे ठेवण्यात आले. आमच्या भारतीय समाजात पुरुषांच्या सम्मान व प्रतिष्ठेसाठी स्त्रीयांचे आयुष्य खर्ची होते. उदा. पुरुषांच्या सन्मानाचा सबंध सदैव त्यांच्या कुटुंबातील स्त्रीयांच्या पावीत्र्याशी जोडले जाते. जर कोणतीही मुलगी किंवा महिला विवाह अगोदर किंवा विवाहानंतर (आपला पती सोडून) तिचे कौमार्य भंग झाले असेल, तिचा बलात्कार किंवा इतरासोबत शारिरीक संबध ठेवले असतील तर तिच्याप्रती समाज किंवा त्या कुटुंबाचे मत बनते की तिने कुटुंबाची प्रतिष्ठा धुळीस मिळवली. त्यांना अपमानीत केले. बऱ्याच वेळा तिला या गुन्हयाबद्दल व कुटुंबाच्या सन्मानासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दयावे लागते. मुलगी किंवा महिले सोबत यौन संबध होत असेल तर त्यास तीच जबाबदार असते का ? पुरुषासाठी कोणतीच शिक्षा का नाही? वास्तवेत यौन संबध पुरुषच करतो, तरीही महिलेसच अपवीत्र व अपमानीत मानले जाते. जागतीक व्यापार संघटना २००२ च्या अहवालानुसार, वैवाहिक जीवनातील हिंसेसंबंधी संपूर्ण जगात झालेली ४८% सर्वेक्षणे स्पष्ट करतात की त्यांच्या जीवनात केंव्हा ना केंव्हा पती मार्फत हिंसेचा वापर करण्यात आला. असे सांगणाऱ्यां महिलांचे प्रमाण १०% ते ६९% पर्यंतचे आहे. वैवाहिक जीवनात शारीरीक अत्याचारासोंबतच मानसीक अत्याचार हि समाविष्टअसतो. तसेच १\३ ते ५६% प्रकरणात यौन शोषण होते. पती-पत्नीच्या संबंधात अनेक प्रकारचे अत्याचार एकमेकांशी संबंधीत असतात. आपल्या जीवनसाथी मार्फत होणारी कौटुंबीक हिंसा कैव्हा-केंव्हा मृत्यूचे कारण बनते. भारतात महिलांची अधिक हत्या मारहाण किंवा जळण्याने होतात. स्त्रीवर रॉकेल टाकून तिस पेटवून दिले जाते. नंतर स्वयंपाक घरात स्टोव्ह किंवा गॅस दुर्घटनेत मृत्यू झाल्याची नोंद केली जाते. अशा प्रकारे कौटुंबीक हिंसाचार का होतो ? प्रारंभी शिव्या देणे, भयभीत करणे, अत्याचार करणे, तसेच नियंत्रणकारी आणि एकाधिकार प्रदर्शीत करणाऱ्या वर्तनाचा याचा समावेश पहिल्या टप्पातील हिंसेत होतो. दुसऱ्या टप्प्यात सातत्याने होणारा अन्याय, राग, शारिरीक त्रास ई. कौटुंबीक हिंसाचार वाढवण्याचे कांही कारणे खालील प्रमाणे आहेत. महिलांचे अज्ञान, अंधविश्वास, रुढीवाद. कुटुंबातील पुरुषांच्या आदेशांचे पालन न करणे, उलटे उत्तर देणे, वेळेवर स्वंयपाक न बनवणे, घरातील लहान मुलांची योग्य देखभाल न

Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-046-1

करणे, पुरुषांच्या नेहमी संपत्ती किंवा मैत्रीणी बाबत विचारपुस करणे, पतीची परवानगी न घेता बाहेर जाणे, पति किंवा कुटुंबातील इतर पुरुषा सोबत शारिरीक संबंध ठेवण्यास विरोध करणे, पुरुष व स्त्रीचा परस्परावरील अविश्वास व संशयी प्रवृत्ती, पत्नीमार्फत आपल्या माहेरकडील लोकांना पतीचे धन पुरवणे ई.

साधारणपणे जगातील महिला मान्य करतात की, पुरुषाना आपल्या पत्नीस नियंत्रण किंवा शिस्तीत ठेवण्याचा अधिकार आहे. गरजेनुसार तो त्या अधिकाराचा वापर करतो. परंतू जेथील संस्कृती पुरुषांना महिलांच्या वर्तनास नियंत्रण करण्याचा अधिकार देतात. तेथे नेहमीच दुराचारी पुरुष आपल्या मर्यादाचे उल्लघन करतात. वैवाहिक हिंसा जगातील प्रत्येक भागातील गंभीर समस्या आहे. यासाठी या दिशाने एक ठोस परिणाम देणाऱ्या कार्यास पूर्ण करणे आवश्यक आहे.

महिला विरुध्द हिंसा नष्ट करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्र महासभा घोषणापत्र व्हिएनात संपन्न मानवी हक्क विश्व संम्मेलन १९९३ चा एक परिणाम असा झाला की, महिला विरुध्द हिंसा नष्ट करण्यासाठी एक विस्तृत घोषणा पत्र जारी केले. ज्यामूळे महिला विरुध्दची हिंसा एक आंतरराष्ट्रीय समस्या म्हणून पुढे आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व देशासाठी त्याचे पालन करणे अनिवार्य आहे. अशा प्रकारे कौटूंबिक हिंसा नष्ट करण्याच्या एका वैश्विक मोहिमेचा प्रारंभ झाला. या आंतरराष्ट्रीय मानवी हक्क करारास मान्यता मिळविण्यासाठी १७९ देशांनी स्वाक्षरी केली. अधिकार आणी सिध्दांत या दोन्हीं आंतरराष्ट्रीय साधनांचा समावेश आहे. उदा. मानवी हक्कांचे वैश्विक घोषणापत्र, नागरी आणि राजकीय अधिकारासंबंधी आंतरराष्ट्रीय प्रतिज्ञा पत्र, महिला विरुध्द प्रत्येक प्रकारच्या भेदभावास नष्ट करण्यासंबंधीच्या सम्मेंलनाचे घोषणापत्र आणि अत्याचार व इतर क्रुर अमानवीय, अपमानजनक वर्तनास दंड देण्याचे सम्मेलनाचे घोषणा पत्र.

अंतिमतः असे म्हणता येते की महिला विरुध्द होणाऱ्या कौटुंबिक हिंसेस स्पष्ट आणि व्यापक रुपात परिभाषीत करावे लागेल. महिला विरुध्द हिंसेच्या सर्व रुप व प्रकारास नष्ट करण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत. एका बाजूने महिलांच्या हिंसाचारांस रोकण्यासाठी कायदे बनतात. त्यात संशोधनही होते. दुसऱ्या बाजूने शासनाच्या योजनेत त्यांना लागुही करतात, परंतू वास्तवतेत जे परीणाम समोर येणे अपेक्षीत असते ते येत नाहीत. त्यासाठी आवश्यकता आहे की जनता, प्रशासन आणि कायदा व त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल व्हावा. अनादिकाळापासूनच्या घोषणा, पारंपारीक मान्यता, धार्मिक विचार, नैतीक मुल्य इ. महिलांवर सामाजिक, आर्थिक किंवा व्यक्तीगत अत्याचार करत आहेत. त्यांना एका दिवसात नष्ट करता येत नाही. परंतु जर व्यापक प्रमाणात प्रत्येक वर्ग व प्रत्येक माध्यम या अभियानात पुर्ण शक्ती व निष्ठेने साथ दिल्यास निश्तिच महिला विरुध्दच्या कौटुंबिक हिंसात्मक हिंसेचा अंत होवू शकतो.

**सदर्भ ग्रंथ :**

१) भारत का इतिहास श्रमण ब्राम्हण संस्कृतियों का संघर्ष - भागीरथ - मूल निवासी प्रकाशन, उदयपूर.
२) भारतीय समाज - श्यामाचरण दुबे - अनुवाद - वंदना मिश्र, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडीया.
३) हिंदु संस्कृती आणि स्त्री - आ.ह. साळुंखे, लोकवाङमय ग्रह मुंबई.
४) भारतीय राज्यघटना राष्ट्रांची कोनशीला - ग्रॅनव्हिल ऑस्टिन - अनुवाद - भारती केळकर, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
५) महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय - प्रा.डॉ. रेखा हिंगोले (माने) इशा प्रकाशन, लातुर.
६) तिसऱ्या विंदुच्या शोधात - डॉ. तारा. भवाळकर, सुगाव प्रकाशन, पुणे.
७) फुले आंबेडकरी स्त्री चळवळ - मीनाक्षी मुन, समता प्रकाशन, नागपूर.
८) परिवर्तनाचा वाटसरु - जाने २०११

◈ ◈ ◈

Scanned by CamScanner